ॐ

# अध्याय पंधरावा

१ उर्ध्व मूळ तें तेविं खालतीं कशी पसरली शाखा
म्हणती अव्यय भव-वृक्षातें 'अश्वत्थ' असें देखा १

आणि ऋग्-यजुः साम वेद ते हीं चि जयाचीं पानें
तो चि वेद-वेद् पुरुष सर्वथा जो त्यासि असा जाणे. २

ऊर्ध्व सहज तें ब्रह्म चि तेथें भव-वृक्षाचें मूळ
ह्यास्तव म्हणती 'ऊर्ध्व-मूळ' परि मुळांत हा निर्मूळ ३

अनादि माया-योगें पहिलें 'महत्' तत्त्व उद्भवलें
आणि सर्वथा पुढें वाढता विस्तार पहा चाले ४

अहं मन तशीं दहा इंद्रियें पंच विषय तन्मात्रा
मग प्रकटती किती आकृती अगणित चित्र-चिचित्रा ! ५

२ सुर-नर-तिर्यक्-योनिरूप ह्या अनंत फांद्या फुटल्या
जिकडे तिकडे खालीं वरतीं उभ्या आडव्या सुटल्या ६

सत्त्व-रज-तम त्रि-गुण-जलभरें कशा पोसल्या पाहें
रूप-रसादिक विषय-पल्लवीं पालवल्या लवलाहें ७
अधोर्ध्व पाळें-मुळें वासना-बीजरूप अवलोकीं
कर्म-बळें ती संतत खालीं पसरलीं चि ह्या लोकीं ८
३ वृक्षाचें ह्या जसें वर्णिलें रूप तसे तें येथें
ज्ञात न होतें अज्ञ-जनातें साद्यन्त असें निरुतें ९
आणि पांडवा, कशी केंधवां कुठे प्रतिष्ठा ह्याची
तयां न च कळे, तर्क पांगळे खुटे धांव बुद्धीची १०
असा पसारा अफाट ह्याचा मुळें हि रुतलीं खोल
उन्मुळावया उपाय करिती ते ते होती फोल ! ११
तरी स्वभावें नाश संभवे जरी अविद्या जाय
स्वप्नीं लागे घाय तयातें जागृति हा चि उपाय १२
म्हणुनि विवेकें वैराग्य-बळें ज्ञान-खड्ग परजावें
त्वरा करुनियां भव-तरूसि ह्या मुळांसहित खांडावें १३
४ पुढें पांडवा, अखंड घ्यावा परम-पदाचा शोध
जिथे पावतां पुन्हा मागुता न च ये होतां बोध १४
परमात्म-पदा तया स्मरुनियां विनम्र-भावें चित्तीं
करीं अर्जुना, अशी प्रार्थना हृदयाच्या एकान्तीं १५
जयापासुनी अनादि माया-प्रपंच-रचना झाली
आधिपुरुष जो तया शरण मी सर्वथैव ह्या कालीं. १६

५ अशी प्रार्थना नित्य अंतरीं करिती तन्मय-चित्तें
सहजें ज्ञाते पावती चि ते अव्यय परम-पदातें १७

सांडुनि जाती घन वर्षान्तीं जसे स्वभावें गगन
तेविं जयातें सोडुनि गेले मोह आणि अभिमान १८

पदार्थमात्रीं अनासक्त जें अध्यात्मीं तल्लीन
नितांत निर्मळ बुद्धि जयांची नसे वासनाधीन १९

सुख-दुःखादि द्वन्द्व-बंध ते आकळिती न जयांतें
सहजें ज्ञाते पावती चि ते अव्यय परम-पदातें २०

६ पद अविनाशी स्वयं-प्रकाशी तेजोमय तें पूर्ण
प्रकाशित तया करूं न शकती सूर्य चंद्र वा अग्न २१

पावतां जिथे पुन्हा न परते स्वर्ग-नरक-संसारीं
जीव समरसे तें चि मम असे परं-धाम अवधारीं २२

७ मुळांत माझा अंश सनातन इथे जीव-लोकांत
'जीव' होउनी कसा वावरे पहा प्राणि-देहांत २३

निज-प्रकृतिगत सहा इंद्रियें मनासहित तीं सारीं
घेइ ओढुनी जाय गुंतुनी म्हणुनी हा संसारीं २४

८ शरीर घेतां नवें जुनें वा सोडुनि जातां देही
'ईश-जीव' हा स्वतांसवें हीं सहा इंद्रियें घेई २५

नेइ वाहुनी सुगंध सारा जसा फुलांतुनि वायु
'लिङ्ग-शरीरा' तेविं 'जीव' हा होता देह गतायु २६

९ आणि त्यासवें नव्या शरीरीं पुन्हा येउनी राही
माया-वश तो होतां दिसतो विषय-विष-रस-ग्राही २७
नेत्र-श्रोत्र-स्पर्शनेंद्रिय-घ्राण-रस-मनोद्वारा
करी असारा-संसाराचा असा पसारा सारा २८
१० सोडुनि जाई अथवा देहीं राहे गुण-संयुक्त
'कर्ता' 'भोक्ता' असे बोल हे पाहें अज्ञ-जनोक्त २९
जाणें येणें भोग भोगणें प्रकृतिचा चि हा खेळ
आत्मा केवळ अलिप्त निर्मळ तया न ह्यांचा मेळ ३०
असें तत्त्वतां पाहे ज्ञाता असे सदा निःसंग
असुनी देही तो चि विदेही जो पर-तत्त्वीं दंग ! ३१
११ जीव-शिवाचें ऐक्य जाणती यत्न-बळें शुद्धात्मे
प्रयत्न करिती परी नेणती चित्त-हीन दुष्टात्मे ३२
वश सरस्वती जरी नाचती षट्-शास्त्रें जिह्वाग्रीं
आणि अंतरीं अहंपणाची असे पुरी सामुग्री ३३
तरी विफल तीं शास्त्रें विद्या कला विभव तें सर्व
जाण अर्जुना, कधीं तयांना भेटें ना मी देव ३४
असे चि आत्मा आत्म्याठायीं देह-धर्म ते देहीं
असें जाणते ज्ञाते निरुते पडती नच संदेहीं ३५
जिथे निजांगें अखंड जागे सारासार-विवेक
विरक्त नर ते तत्त्व देखती सदा अनेकीं एक ३६

बिंब एकलें जसें बिंबलें रविचें नाना डोहीं
अनंतनामा मी सर्वात्मा तसा चि सर्वां देहीं　३७

१२ त्या रवि-बिंबीं जगा अखिल जें सदा उजळितें तेजें
जाण शशांकीं तसें पावकीं असे तेज तें माझें　३८

१३ करीं निज-बळें भूत-धारणा पृथ्वीमाजिं रिगून
तसा रसाधिप चंद्र होउनी करीं औषधी-भरण　३९

१४ मी वैश्वानर-रूप घेउनी राहें प्राणि-शरीरीं
प्राणापानीं युक्त होउनी अन्नें पचवीं चारी　४०

१५ असे चि माझी सदैव सर्वां अंतर्यामीं वस्ती
म्हणुनी स्फुरते प्राणि-गणांतें 'मी अमुका' ही स्फूर्ती　४१

संत-संगतीं सद्गुरु-भक्तिस्तव ती ज्ञान-प्राप्ति
होतां घेई 'अहं' जयाचें पर-तत्त्वीं विश्रांति　४२

ज्ञान-विरक्ती-बळें देखती स्वतां आपुलें रूप
ज्ञानी-जन ते आत्मानंदीं होती मग तद्रूप !　४३

परी अहंता देहीं वसतां संसारीं चि निमग्न
होउनि दारुण दुःख भोगिती अज्ञ विषय-संलग्न　४४

कर्म तसें फळ मिळे चि केवळ जगीं उच्च वा नीच
परी अर्जुना, ज्ञानाज्ञाना मुळांत कारण मीच　४५

जशी जयाची बुद्धि तसा तो स्वरूप समजे माझें
जगीं स्वतेजें मी चि विराजें कणाकणांतुनि सहजें　४६

शब्द-ब्रह्मीं अंतर्यामीं मी चि एक जाणावा
रहस्य-कर्ता वेदान्ताचा वेद-ज्ञ हि मी बरवा ४७

१६ क्षर आणिक तो अक्षर ऐसे दोन पुरुष ह्या लोकीं
भूत-जात तो 'क्षर' 'अक्षर' तो कूटस्थचि अवलोकीं ४८

येथ पांडवां, 'परा प्रकृति' वा जीव-भूत चैतन्य
तें चि तत्त्वतां क्षर पुरुषाचें रूप सर्वथा जाण ४९

निज-विस्मृतिची येतां निद्रा जीव-रूप होऊन
भव-स्वप्न हें पाहे आत्मा उपाधींत गुंतून ५०

'मी माझें' हें घेउनि ओझें सुख-दुःखें उपभोगी
म्हणुनि जयातें नसतें येथें क्षरत्व आलें अंगीं ५१

विश्व मावळे सगळें केवळ घन-अज्ञान-सुषुप्ति
नसे हि जेथें ज्ञान-स्फूर्ती 'अक्षर-पुरुष' दशा ती ५२

मायोपाधिक चैतन्य चि जें बीज जीव-कार्याचें
जाणें पार्था, रूप सर्वथा तें 'अ-क्षर' पुरुषाचें ५३

किंबहुना जें विविध विकारीं स्थिर अविकारी सत्त्व
स्वरूप 'अक्षर' पुरुषाचें तें माया-वेष्टित तत्त्व ५४

अधःशाख भव-तरुचें वरचें मूळ पुरुष 'अक्षर' चि
माया-शक्ति ब्रह्म-पदाची जगत्कार्य जी विरची ५५

१७ परंतु आणिक जो निरुपाधिक तिजा पुरुष तो आहे
नांव न साहे ह्या दोहींचें ह्यांतें गिळुनी राहे ५६

ज्ञानाज्ञाना-विरहित तैसें भावाभावातीत
स्वतःसिद्ध तें तिथें संपतें द्वैत आणि अद्वैत ! ५७

परमात्मा जो अव्यय ईश्वर विश्वंभर विख्यात
जो त्रैलोक्यीं भरुनि राहिला असे चि ओत-प्रोत ५८

जैसा वह्नी काष्ठ जाळुनि स्वयें जळे संपूर्ण
तसें ज्ञान तें अज्ञानातें गिळुनी जाय विरून ५९

उरे ब्रह्म जें एक ना दुजें नसे चि भिन्नाभिन्न
शाश्वत सुख-दा परमात्म-पदा वर्णील असा कोण ! ६०

'सोऽहं' तेंही जिथे मावळे द्रष्टा-दर्शन-दृश्य
एकरूप तीं होती जाणें तो परमात्मा ईश ! ६१

१८ क्षरातीत मी अक्षराहुनी उत्तम मी त्या अर्थी
पुरुषोत्तम मी वेदीं लोकीं ऐसी माझी ख्याति ६२

१९ नर जो ज्ञानी मोह सारुनी दूर तत्त्वतां जाणे
तो चि मज अशा उत्तम-पुरुषा भजे सर्व-भावानें ६३

जशा सागरीं उठतां लहरी जळ चि जळावरि लोळे
तसा अंतरीं मद्रूप तरी भक्त होउनी खेळे ६४

सोनें-लेणें एक चि जाणें सूर्य आणि तीं किरणें
तेविं सर्वथा मी चि होउनी जगीं तया वावरणें ६५

२० असे चि पार्था, तुझें सर्वथा निर्मल अंतःकरण
म्हणुनि शास्त्र हें तुज सांगितलें भलें गूढ जें गहन ६६

जाणुनियां हें नर तो पाहें ब्रह्म-रूप होऊन
कृतार्थ होतो सहजें सुटतो कर्म-बंधनांतून ६७

असा पंचदशाध्यायीं पुरुषोत्तम-योग हा ।
येथें भावार्थ गीतेंत सांगोपांग निवेदिला ॥ १५ ॥